महाराष्ट्र शासन
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

दूरध्वनी क्र. ०२०-२६१२ २०७६ Email ID: ddtp.ho@maharashtra.gov.in

---

## -: कार्यालयीन आदेश :-

विषय : नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील निलंबित कर्मचाऱ्यांना शासन सेवेत पुनःस्थापित करण्याबाबत...

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक, नगर रचना (ना.सं.घ.)
आ.क्र. 9846 दिनांक- 20/12/2021
संबधित अधि./कर्म.
न.र. उ.स.न.र.

संदर्भ : १. या कार्यालयाचे पत्र क्र.आस्था/निओचौ-रस/प्र.१अ/५५६, दि.१२.११.२०२१.

२. अध्यक्ष, विभागीय निलंबन आढावा समिती तथा विभागीय आयुक्त, अमरावती यांचे आदेश क्र.विआकाअ/म.शा.१/निलंबन आढावा/कावि:८३४/२०२१, दि.१८.११.२०२१

**प्रस्तावना :-**

या संचालनालयाच्या आस्थापनेवरील खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यास, त्यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईच्या अनुषंगाने निलंबित करण्यात आले होते :-

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव व पदनाम | निलंबनापूर्वीचे कार्यालय | निलंबन आदेशाचा दिनांक | निलंबनाचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.नितेश ओमप्रकाश चौरसिया, रचना सहायक | मंगरुळपीर नगरपरिषद, जि.वाशिम | १६.०३.२०२१ | ०८.२.२०२१ | मानीव निलंबन |

०२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१४ ऑक्टोबर, २०११, दि.२० एप्रिल, २०१३, दि.३१ जानेवारी, २०१५, दि.२८ मार्च, २०१८ व दि.०९ जुलै, २०१९ रोजीचे शासन निर्णयामधील तरतुदीनुसार अन्वेषण, चौकशी किंवा फौजदारी गुन्ह्याबाबतचा खटला प्रलंबित असलेल्या गट-'क' व गट-'ड' मधील निलंबित शासकीय कर्मचाऱ्यांची शासन सेवेत पुनःस्थापना करण्याबाबत अमरावती विभागीय स्तरावरील आढावा समितीची बैठक दि.१६ नोव्हेंबर, २०२१ रोजी मा.विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदरहू बैठकीमध्ये शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील, शासन निर्णय दि.१४ ऑक्टोबर, २०११ मधील परिच्छेद ४ (अ) व परिच्छेद ४(ब) मधील तसेच, शासन निर्णय दि.३१ जानेवारी, २०१५ व दि.०९ जुलै, २०१९ मधील तरतूदी विचारात घेऊन या संचालनालयाच्या आस्थापनेवरील निलंबित कर्मचारी श्री.नितेश ओमप्रकाश चौरसिया,

रचना सहायक यांचेसह १७ (सतरा) शासकीय कर्मचाऱ्यांना मा.न्यायालयीन व विभागीय चौकशी मधील निर्णयाच्या अधीन राहून, शासन सेवेत पुन:स्थापित करण्याबाबत समितीने शिफारस केली असून, पुन:स्थापनेचे आदेश पारीत करण्याबाबत संदर्भिय क्र.२ येथील आदेशान्वये नियुक्ती प्राधिकारी यांना सूचित केले आहे.

०३. उक्त शिफारशीनुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम-४ (५) (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन, श्री.नितेश ओमप्रकाश चौरसिया, रचना सहायक (निलंबित) यांचे निलंबन संपुष्टात आणून त्यांच्याविरुद्ध सुरु असलेल्या विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरणांमधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून, त्यांना शासन सेवेत पुन:स्थापित करण्याविषयी अध्यक्ष, विभागीय निलंबन आढावा समिती तथा विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिलेल्या मान्यतेनुसार, श्री.नि.ओ.चौरसिया, रचना सहायक (निलंबित) यांचे पदस्थापनेबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत.

**-: आदेश :-**

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | निलंबनापूर्वीचे कार्यालय | पुन:स्थापनेनंतर पदस्थापनेचे कार्यालय. |
|---|---|---|---|
| १. | श्री.नितेश ओमप्रकाश चौरसिया, रचना सहायक | मंगरुळपीर नगरपरिषद, जि.वाशिम | कार्यकारी अभियंता, अंमलबजावणी कक्ष, नगर रचना, नागपूर (रिक्त पदी) |

०२. शासन सेवेत पुन:स्थापित करण्यात येत असलेल्या उपरोक्त कर्मचाऱ्याने **दि.१५.१२.२०२१** (म.पू.) किंवा लगोलग पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू व्हावे.

०३. या आदेशान्वये शासन सेवेत पुन:स्थापित करण्यात येत असलेले उपरोक्त कर्मचारी हे पदस्थापनेच्या ठिकाणी ज्या दिवशी रुजू होतील, त्या दिनांकापासून त्यांचे निलंबन संपुष्टात आल्याचे समजण्यात येईल.

०४. प्रस्तुत कार्यालयीन आदेश या संचालनालयाचे www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरदेखील प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

**(मूळ मसुदा मा.संचालकांनी मंजूर केला असे.)**

जा.क्र.आस्था/निलंबन/पुन:स्थापना/प्रशा-१/ ५८११
मध्यवर्ती कार्यालये, पुणे -४११ ००१
दिनांक -१४ डिसेंबर, २०२१.

( वि.ल.वाघमोडे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

<u>प्रत माहितीस्तव सादर :</u>

१. मा.प्रधान सचिव, (नवि-१), नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई-३२.

२. मा.महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
३. मा.अध्यक्ष, विभागीय निलंबन आढावा समिती तथा विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.

<u>प्रत माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :</u>

१. सहसंचालक, नगर रचना, अंमलबजावणी कक्ष, पुणे / अमरावती विभाग / नागपूर विभाग.
२. कार्यकारी अभियंता, अंमलबजावणी कक्ष, नगर रचना, नागपूर
३. सहायक संचालक, नगर रचना, वाशिम शाखा
४. मंगरुळपीर नगरपरिषद, जि.वाशिम
५. कोषागार अधिकारी, वाशिम / नागपूर
६. श्री.नि.ओ.चौरसिया, रचना सहायक (विहित मार्गाने)
७. कार्यासन अधिकारी, मुख्य कार्यालय, प्रशा-१अ /प्रशा-१ ब /लेखा.
८. श्री.पालकर, स्वी.स. / श्रीमती हुपरे उ.श्रे.ल.ले.
९. वैयक्तिक धारिका.
१०. संशोधन अधिकारी, ना.सं.घ. / रा.ना.मा.प.
/- प्रस्तुत आदेश संचालनालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.